
# गुणाकार

## समजून घेऊया

प्रत्येक प्लेटमध्ये ३-३ लाडू आहेत.

एकूण किती लाडू आहेत, ते मोजूया.



एकूण चार प्लेटमधील लाडू म्हणजेच


**३ लाडू ४ वेळा** घेऊन केलेली बेरीज होय.

३ + ३ + ३ + ३ = १२

३ + ३ + ३ + ३ हे गुणाकार रूपात ३ × ४ असे लिहितात.

म्हणजेच १२ ही संख्या ३ आणि ४ यांचा गुणाकार आहे.

| | | |
|---|---|---|
| | ३ | गुण्य |
| × | ४ | गुण्यक |
| | १ २ | गुणाकार |




गुणाकार म्हणजे एकच संख्या पुन्हा पुन्हा घेऊन केलेली बेरीज.






समान संख्यांची वारंवार बेरीज करण्यापेक्षा लवकर उत्तर मिळावे म्हणून आपण गुणाकार करतो.

यासाठी पाढे उपयोगी पडतात.


३ × ४ = १२ याचे वाचन आपण **३ गुणिले ४ बरोबर १२** असे करतो.

## सोडवून पाहूया

- वस्तूंचे गट बघ. सारणी पूर्ण कर.

| चित्रे | काय दिसले ? | बेरीज रूप | गुणाकार रूप | एकूण | वाचन |
|---|---|---|---|---|---|
|  | ५ फुले ४ वेळा | ५ + ५ + ५ + ५ | ५ × ४ | २० | ५ गुणिले ४ बरोबर २० |
|  | | ८ + ८ | | १६ | |
|  | ४ मासे ४ वेळा | | ४ × ४ | | |
|  | ६ फुलपाखरे ३ वेळा | | | | ६ गुणिले ३ बरोबर १८ |
|  | | ३ + ३ + ३ | | ९ | |

- पुढील गुणाकाराचे झाड पूर्ण कर.



- **एका माळेत ६ फुले आहेत, तर अशा ३ माळांत फुले किती?**

| | | |
|---|---|---|
| × | ☐ | एका माळेतील फुले |
| | ☐ | माळा |
| | ☐ | एकूण फुले |

- **फळबागेत एका रांगेत ५ नारळाची झाडे याप्रमाणे ७ रांगेत एकूण किती नारळाची झाडे लावता येतील?**

| | | |
|---|---|---|
| × | ☐ | एका रांगेतील झाडे |
| | ☐ | रांगा |
| | ☐ | एकूण झाडे |

## सराव करूया

- गुणाकार कर. (उभी मांडणी)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ८ | ३ | ५ | ९ | ६ |
| × ७ | × ४ | × ५ | × ६ | × ३ | × २ |
| | | | | | |

- गुणाकार कर. (आडवी मांडणी)

५ × १ = ५   ३ × १ = ☐   १० × ० = ☐   ८ × ० = ☐

७ × ० = ☐   ९ × १ = ☐   ४ × ३ = ☐   ६ × ७ = ☐

- गुणाकार सारणी पूर्ण कर.

| × | ० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १ | ० | १ | २ | ३ | ४ | | | | | |
| २ | ० | २ | ४ | ६ | ८ | | | | | |
| ३ | ० | ३ | ६ | ९ | १२ | | | | | |
| ४ | ० | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | |